# नागरी सुविधा पुरविण्यातील सर्व्हेक्षणात मिरा-भाईंदर महानगरपालिका अव्वल

भाईंदर : मिरा-भाईंदरवासियांना सोशल मिडीया आणि ॲपच्या माध्यमातून नागरी सोई सुविधा पुरविण्यात अग्रेसर ठरलेल्या मिरा-भाईंदर महानगरपालिकेला पुण्यातील पॉलीस रिसर्च ऑर्गनायझेशन या संस्थेच्या सर्व्हेक्षणात प्रथम क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. राज्यातील 27 महानगरपालिकांच्या ई-सर्व्हेलन्सबाबतचा आढावा या संस्थेच्या वतीने घेण्यात आला होता.

राज्यातील या महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांना नागरी सुविधा पुरविण्याबाबत महानगरपालिकेने अधिकृत वेबसाईट, मोबाईल ॲप्लीकेशन, सोशल मिडीया हॅन्डल्स यांचा वापर कशा प्रकारे केला जात आहे, याचे सर्व्हेक्षण या संस्थेमार्फत 1 नोव्हेंबर ते 31 डिसेंबर या कालावधीत करण्यात आले होते. महानगरपालिकेचा पारदर्शक कारभार, नागरी सुविधांबाबत उपलब्ध ऑनलाईन सेवा, महानगरपालिकेची वेबसाईट, मोबाईल ॲप्लीकेशन आदींचा वापर या महानगरपालिकांनी कशा पद्धतीने केला आहे, याचा या सर्व्हेक्षणात गांभिर्याने विचार करण्यात आला होता. इतकेच नव्हे तर कोरोना काळात करावयाच्या उपाययोजना, लसीकरण आदींबाबत उचललेल्या ठोस पाऊलांचीदेखील या संस्थेने नोंद घेतलेली होती.

या सर्व्हेक्षणामध्ये My MBMC ॲपच्या माध्यमातून शहरातील नागरीकांसाठी पाणी पुरवठा विभागामार्फत करण्यात येणारी आवाहने, मालमत्ता कर भरणा तसेच पाणीपट्टी कर भरणा, नविन नळजोडणी, मान्यताप्राप्त बांधकामांची माहिती आदी मुलभूत नागरी सुविधा ऑनलाईन पद्धतीने देण्याबाबत मिरा-भाईंदर महानगरपालिकेने केलेल्या विविध उपाययोजनांबाबतची दखल देखील या संस्थेने घेतली असल्याचे आयुक्त दिलीप ढोले यांनी सांगितले.

राज्यातील सर्व महानगरपालिकांमध्ये या सोईसुविधा देण्यामध्ये मिरा-भाईंदर महानगरपालिकेने पुणे महानगरपालिकेबरोबर गुणांची बरोबरी साधून प्रथम क्रमांक मिळविला असून महानगरपालिकेची सर्व उपक्रमात उपलब्धता व महानगरपालिकेच्या कामातील पारदर्शकता यामध्ये तृतीय क्रमांक मिळविला आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिकेला मिळालेल्या या गौरवास्पद पुरस्काराबद्दल महापौर ज्योत्स्ना हसनाळे आणि महापालिका आयुक्त दिलीप ढोले यांनी माहिती तंत्रज्ञान विभाग व जनसंपर्क विभाग यांचे अभिनंदन केले आहे.